करोना २०२०/सुचना/आदेश क्रमांक - 221-उन  (४)

महाराष्ट्रशासन
महसूलववनविभाग
जिल्हाधिकारीवजिल्हादंडाधिकारीकार्यालय,रायगड-अलिबाग
हिराकोटतळयाजवळ,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड४०२२०१
❖दुरध्वनीक्र:०२१४१-२२२११८/२२२०९७/२२२३२२❖फॅक्सक्र:०२१४१-२२७४५२❖
❖ई-मेल:tahasildarmahasul@gmail.com❖

क्रमांक : साशा कार्या/ब-५/करोना-२०२० | दिनांक : १४/०४/२०२०.

वाचले:-

१. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील अधिससूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
२. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील पत्र क्र.करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य-५/, दिनांक १४/०३/२०२०
३. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५, कलम ३४
४. महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ४३, ५६
५. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७
६. महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाययोजना नियम, २०२०
७. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/करोना रुग्ण/ माहिती/२०२०, दिनांक १२/४/२०२०
८. या कार्यालयाकडील आदेश क्र.साशा कार्या/ब-५/करोना-२०२०, दिनांक १२/४/२०२०
९. तहसिलदार उरण यांचेकडील पत्र क्र.जमिनबाब/कात-२/सुधारित कंटनमेंट झोन/२०२०, दिनांक १३/४/२०२०

---

**सुधारित आदेश,**

रायगड जिल्हयातील उरण तालुक्यात १. श्री.परेश प्रभाकर भोईर, वय ३७ वर्षे, रा. कोटनाका, उरण २. श्रीम.वर्षा यादव, वय-३१, रा.ए-९३०६, सेक्टर, जेएनपीटी टाऊनशिप हया दोन्ही व्यक्ती करानो विषाणु बाधीत आढळून आल्याने तेथे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, खालील क्षेत्र Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) म्हणून जाहिर करणेबाबत व त्याप्रमाणे आदेश निर्गमित होणेबाबत तहसिलदार उरण यांनी दिनांक १२/४/२०२० रोजीच्या पत्रान्वये विनंती केली होती.

१. आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर-मच्छिमार्केट – उमेश गायकवाड, घर-सतिश फोटो स्टूडीओ-शिवप्रेरणा इमारत राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग,
२. जेएनपीटी टाऊनशिप सेक्टर-२, A,B,C टाईप

वरील तहसिलदार उरण यांच्याकडील पत्राच्या अनुषंगाने या कार्यालयाकडील आदेश दिनांक १२/४/२०२० अन्वये उरण तालुक्यातील वरील क्षेत्र हे Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) म्हणून व प्रतिबंधक क्षेत्र म्हणून जाहिर करणेत आलेले आहे.

आता तहसिलदार उरण यांनी दिनांक १३/४/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदरचा परिसर हा जवाहरलाल नेहरु बंदर साठीचे रहिवाशी क्षेत्र असून, सदर परिसरात रहिवाशी इमारती असल्या कारणाने आरोग्य विभागाकडील पथकास त्याचा निश्चित बोध होत नाही. तरी आदेशामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करुन मिळणेबाबत विनंती केली आहे.

१. आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर-मच्छिमार्केट – उमेश गायकवाड, घर-सतिश फोटो स्टूडीओ-शिवप्रेरणा इमारत राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग,
२. जेएनपीटी टाऊनशिप सेक्टर – २ A९० ते ९५

**सबब रायगड जिल्हयातील उरण तालुक्यात दोन व्यक्ती करानो विषाणु बाधीत आढळून आल्याचे तहसिलदार उरण यांनी दिनांक १२/४/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. तसेच तहसिलदार उरण यांनी दिनांक १३/४/२०२० रोजीच्या पत्रान्वये कळविल्यानुसार रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील कोटनाका व जेएनपीटी टाऊनशिप व त्याच्या आजूबाजूचा परिसर, यामध्ये कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी, या कार्यालयाकडील आदेश दिनांक १२/४/२०२० अन्वये जाहिर केलेले Containment Zone ( करोना विषाणू बाधीत क्षेत्र ) क्षेत्र खालीलप्रमाणे वाचण्यांत यावे.**

**१. आनंदी निवास-आनंदी हॉटेल-राघोबा देव मंदिर-मच्छिमार्केट – उमेश गायकवाड, घर-सतिश फोटो स्टूडीओ-शिवप्रेरणा इमारत राखे बिल्डींग-काळाधोंडा-भोईर बंगला, केळकर बिल्डींग,**
**२. जेएनपीटी टाऊनशिप सेक्टर – २ A९० ते ९५**

सदर परिसरात रहाणाऱ्या नागरिकांना घरातुन बाहेर पडण्यास व अन्य ठिकाणी स्थलांतरीत होण्यास तसेच बाहेरून येणाऱ्या लोकांना सदर बाधीत क्षेत्रात प्रवेश करण्यास मी निधी चौधरी, जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड, या आदेशाव्दारे प्रतिबंध करीत आहे.

तरी अशाप्रकारचा प्रतिबंध लागू असल्याबाबत रायगड जिल्हयातील उरण तालुक्यातील वरील भागामध्ये व कोरोना विषाणु बाधीत क्षेत्र म्हणुन घोषीत केलेल्या आजुबाजूच्या परिसरात येणारी सर्व महानगरपालिका /नगरपरिषद प्रभाग/गावे यामधील सर्व शासकीय कार्यालये . सार्वजनिक ठिकाणे येथे लेखी नोटीस लावून तसेच दवंडी देवुन मुख्याधिकारी, तलाठी , ग्रामसेवक व पोलीस पाटील यांनी प्रसिध्दी दयावी.

Scanned with CamScanner

सदर आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम , २००५ कलम ५१ अन्वये तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम ७१ , १३९ तसेच भारतीय दंड संहिता ( ४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ अन्वये कारवाई करण्यात येईल.

(निधी चौधरी)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड

प्रत :- मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई यांना पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
प्रत :- जिल्हा पोलीस अधिक्षक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- मुख्य कार्यकारी अधिकारी, रा.जि.प.अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा शल्य चिकीत्सक, रायगड-अलिबाग यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- उप विभागीय अधिकारी पनवेल यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तहसिलदार उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी ,
प्रत :- मुख्याधिकारी उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी.
प्रत :- वरीष्ठ पोलीस निरीक्ष्क, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- गट विकास अधिकारी, उरण यांना पुढील कार्यवाहीसाठी
प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी, रायगड-अलिबाग यांना आवश्यक त्या प्रसिध्दिसाठी

जिल्हाधिकारी, रायगड
Collector of Raigad

(निधी चौधरी)
जिल्हादंडाधिकारी तथा अध्यक्ष
आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण रायगड

Scanned with CamScanner